राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# पायाभूत चाचणी २०२३–२४

## इयत्ता – पाचवी : विषय – मराठी (प्रथम भाषा)

## शिक्षकांसाठी सूचना आणि उत्तरसूची

'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात राज्यस्तरावरून विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन चाचणी – १ व संकलित मूल्यमापन चाचणी – २ अशा तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने संबधित इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी या चाचण्यांद्वारे करण्यात येईल. राज्यस्तरावरून २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात सुरुवातीस इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्तींवर आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी मागील इयत्तेमधील अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केल्या आहेत हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून इयत्तानिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्तींचे विकसन करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांची अध्ययन संपादणूक ही अध्ययन निष्पत्तींच्या आधारे तपासली जाणार आहे. या पुढील काळात होणारी सर्व राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणे व राज्य अध्ययन संपादणूक सर्वेक्षणे ही अध्ययन निष्पत्तींवर आधारित असणार आहेत, त्यामुळे पायाभूत चाचणी विकसित करताना मागील इयत्तांच्या विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या आहेत.

**तोंडी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) तोंडी चाचणीसाठी काही पूरक साहित्य आवश्यकता असल्यास (उदा. शब्द कार्डे, वाक्य कार्डे, चित्रे इ.) असे साहित्य पुरेशा संख्येने चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार करून ठेवावे.

२) तोंडी चाचणी घेत असताना चित्र निरीक्षण, श्रवण, वाचन इ. कृतींसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात येण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी.

४) वयोगटानुसार विद्यार्थ्यांच्या घरच्या/परिसर भाषेचा स्वीकार करावा.

५) तोंडी प्रश्नांचा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद वैयक्तिक स्वरूपात घ्यावा व प्रतिसादानुसार लगेचच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्राप्त गुणांची नोंद दिलेल्या गुणनोंद तक्त्यात करावी, अर्धा गुण देऊ नये.

**लेखी चाचणी घेण्यासाठी सूचना :**

१) इयत्ता तिसरी व चौथीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचून दाखवावा, काय करावयाचे आहे, हे समजावून सांगावे व तो प्रश्न सोडवायला सांगावा. याप्रमाणे एक एक प्रश्न पूर्ण करत चाचणी सोडवून घ्यावी.



Scanned with CamScanner

२) इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे त्यांना प्रश्न समजावून सांगावा. मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.

३) विद्यार्थ्यांची नेमकी संपादणूक लक्षात घेण्यासाठी पारदर्शी व तणावमुक्त वातावरणात चाचणी घेण्यात यावी. शाळेच्या मधल्या सुट्टीची वेळ झाल्यास अथवा मुले कंटाळली आहेत असे वाटल्यास थोडा वेळ थांबून नंतर उरलेली चाचणी घेण्यास हरकत नाही.

४) लेखी चाचणीमध्ये उत्तरे लेखनासाठी आवश्यक जागा देण्यात आलेली आहे.

५) संबंधित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी आपल्या वर्गात ही चाचणी घ्यावयाची आहे व ती तपासावयाची आहे.

६) प्रत्येक विद्यार्थ्याची सद्य:स्थितीमध्ये नेमकी संपादणूक कशी आहे, हे पाहणे हा मुख्य उद्देश चाचणी घेण्यामागे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत सदर चाचणी घेण्याबाबतचा निर्णय संबंधित विद्यार्थ्यांचा दिव्यांग प्रकार लक्षात घेऊन शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांनी घ्यावा. आवश्यकतेनुसार विशेष तज्ज्ञ किंवा विशेष शिक्षक यांची मदत घ्यावी.

७) प्रात्यक्षिक/तोंडी आणि लेखी चाचणीचा गुणनोंदणी तक्ता चाचणीच्या सुरुवातीला देण्यात आलेला आहे. प्रश्ननिहाय गुणांची नोंद सदर तक्त्यात शिक्षकांनी करावयाची आहे. अर्धा गुण देऊ नये.

८) शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणांचे विश्लेषण करून वर्गस्तरावर गरजेनुरूप कृती-कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी करावी.

---

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ४० | ५० |

**तोंडी चाचणी**

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. १) | **गोष्ट ऐक व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 04.01.01 | ५ |
| | • शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा वयोगट/समज लक्षात घेऊन गोष्टीची निवड करून गोष्ट सांगावी.<br>• गोष्ट सांगताना आवाज, विरामचिन्हे इत्यादींकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.<br>• गोष्टीमधील पात्र, भूमिका किंवा आशयावर ज्ञान व आकलनावर आधारित पाच प्रश्न वैयक्तिकपणे विचारावेत.<br>• प्रत्येक प्रश्नाचे विद्यार्थ्याने समर्पक उत्तर दिल्यास प्रत्येकी १ गुण द्यावा. | | प्रत्येकी गुण १ |
| प्र. २) | **शिक्षकांनी म्हटलेली कविता ऐक व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सांग.** | 04.01.02 | ५ |
| | • शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन त्यांच्या आकलनास सोपी असणारी एक कविता निवडून विद्यार्थ्यांना ऐकवावी. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक स्वरूपात प्रत्येकी पाच प्रश्न विचारावेत. हे प्रश्न कवितेचा विषय, पात्र, शीर्षक, शब्दरचना इत्यादीबाबत ज्ञान, आकलन स्वरूपाचे असावेत.<br>• प्रत्येक प्रश्नाचे विद्यार्थ्याने समर्पक उत्तर दिल्यास प्रत्येकी १ गुण द्यावा. | | प्रत्येकी गुण १ |



Scanned with CamScanner

| लेखी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
| प्र. ३) | **खालील उतारा वाच व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 04.01.06 | ५ |
| | अ) विद्यार्थ्यांनी स्वतःचे अनुभव आणि समज यातून लेखन केलेली उदाहरणे अपेक्षित आहेत. लेखन केलेल्या उत्तरांना प्रश्नांसोबत संबंध पडताळून गुणदान करावे.<br>उदा., ओला कचरा - फळांच्या साली, भाज्यांची देठे, खरकटे इत्यादी.<br>उदा., सुका कचरा - तुटलेले प्लॅस्टिक, खोकी, रिकाम्या बाटल्या इत्यादी.<br>• विद्यार्थ्याने दोन्ही प्रकारची किमान २ उदाहरणे लिहिल्यास २ गुण.<br>१ उदाहरण लिहिल्यास १ गुण.<br>आ) मुलांनी स्वतःच्या अनुभवातून केलेले लेखन अपेक्षित आहे.<br>• दोन वाक्यांत समर्पक उत्तर लिहिल्यास २ गुण.<br>• एका वाक्यात समर्पक उत्तर लिहिल्यास १ गुण.<br>इ) पुढीलप्रमाणे समर्पक उत्तर लिहिल्यास.<br>उदा. श्रमदानाने विहीर खोदणे/श्रमदानाने विहिर खोदणे या गोष्टीचा अभिमान वाटला पाहिजे. | | २<br>२<br>१ |
| प्र. ४) | **पुढील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिही.** | 04.01.11 | ४ |
| | अ) विद्यार्थ्यांनी लेखन केलेल्या अवजारांची नावे आणि त्यांचे उपयोग यांची माहिती तपासावी. विद्यार्थ्यांची समज तपासावी.<br>• दोन अवजारांची नावे लिहिल्यास २ गुण.<br>• एका अवजाराचे नाव लिहिल्यास १ गुण.<br>आ) १) कॉम्प्युटर - संगणक, २) डान्स - नृत्य<br>(बरोबर उत्तरास प्रत्येकी १ गुण) | | २<br>२ |
| प्र. ५) | **सूचनेनुसार कृती कर.** | 04.01.12 | ९ |
| | पुढीलप्रमाणे प्रत्येक बरोबर उत्तरास १ गुण द्यावा.<br>अ) १) शाळा २) नद्या (प्रत्येकी १ गुण)<br>आ) १) स्त्रीलिंग २) पुल्लिंग (प्रत्येकी १ गुण)<br>इ) वाक्यामध्ये अर्थपूर्ण विशेषण वापरल्यास पूर्ण गुण द्यावेत.<br>१) हुशार, सुंदर इत्यादी. (प्रत्येकी १ गुण)<br>२) छान, मनमोहक इत्यादी. (प्रत्येकी १ गुण)<br>ई) १) त्याने २) तो (प्रत्येकी १ गुण)<br>उ) सरसर | | २<br>२<br>२<br>२<br>१ |
| प्र. ६) | **कंसातील योग्य शब्द वापरून वाक्य पूर्ण कर.** | 04.01.13 | ४ |
| | बरोबर उत्तरास प्रत्येकी १ गुण द्यावा.<br>अ) भारतरत्न<br>आ) सत्याग्रह<br>इ) अभयारण्य<br>ई) प्रदर्शन | | १<br>१<br>१<br>१ |



Scanned with CamScanner

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती | गुणदान |
|---|---|---|---|
| प्र. ७) | **खालील चित्राचे निरीक्षण कर व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 04.01.14 | ५ |
| | अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | | १ |
| | आ) अर्थपूर्ण घोषवाक्य तयार केल्यास पूर्ण गुण द्यावेत.<br>अर्धवट स्वरूपात घोषवाक्य तयार करण्याचा प्रयत्न केल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| | इ) चित्रातील आशयावर आधारित विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखनावरून त्यांचे आकलन व समज तपासावी. किमान चार-पाच ओळी वाक्यांचे लेखन अपेक्षित आहे.<br>• चार ते पाच ओळीत अर्थपूर्ण वर्णन केल्यास २ गुण.<br>• दोन ते तीन ओळीत अर्थपूर्ण वर्णन केल्यास १ गुण.<br>• काहीच लिहिले नसल्यास/एखादा शब्द/अर्धवट वाक्य लिहिल्यास ० गुण द्यावेत. | | २ |
| प्र. ८) | **खालील कविता वाच व त्यावर आधारित दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** | 04.01.16 | ५ |
| | अ) विविध रंगी पाकळ्या/वेगवेगळ्या रंगांच्या पाकळ्या या आशयाच्या उत्तराचा स्वीकार करावा. | | १ |
| | आ) खांदा. | | १ |
| | इ) येतात, गातात, जातो, बसतो, हसतो, उघडून, म्हणाले, ऐकतो यांपैकी कोणताही एक शब्द लिहिल्यास. | | १ |
| | ई) दिलेले सर्व शब्द वापरून समर्पक वाक्य लिहिल्यास. | | १ |
| | उ) दिलेल्या ओळीशी यमक जोडणारी अर्थपूर्ण ओळ तयार केल्यास पूर्ण गुण द्यावेत. अपूर्ण ओळीस गुण देऊ नयेत. | | १ |
| प्र. ९) | – | 04.01.17 | ४ |
| | अ) खाली दिलेल्या वाक्यांत योग्य विरामचिन्हे दे आणि वाक्य पुन्हा लिही.<br>१) दुकानदार काका म्हणाले, ''हे घे तुझे उरलेले पैसे.''<br>(याप्रमाणे उत्तर लिहिल्यास) | | १ |
| | २) आई ओरडली, ''तुला उशीर का झाला?''<br>(याप्रमाणे उत्तर लिहिल्यास) | | १ |
| | आ) खाली दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिही.<br>१) एकेरी अवतरण चिन्ह. | | १ |
| | २) उद्गारवाचक चिन्ह. | | १ |
| प्र. १०) | **खाली दिलेल्या प्रसंगावरून संवाद लिही.** | 04.01.18 | ४ |
| | विषयावर आधारित विद्यार्थ्यांनी केलेल्या लेखनावरून आकलन व समज तपासावी. किमान पाच ते सहा ओळींमध्ये संवाद लिहिणे अपेक्षित आहे.<br>• पाच ते सहा ओळीत अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास ४ गुण.<br>• तीन ते चार ओळीत अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास ३ गुण.<br>• दोन ओळीत अर्थपूर्ण संवाद लिहिल्यास २ गुण.<br>• एक ओळ लिहिल्यास १ गुण. | | |



Scanned with CamScanner